# Month :- August 2023

## Celebration of Rakshabandhan





# आपले पुणे आपली बातमी

पुणे विभाग, सावरगाव प्रतिनिधी: रामकृष्ण भागवत

30-08-2023

## समाज रक्षक पोलिसांना राखी बांधण्याचा कार्यक्रम स्तुत्य आहे.:- ए.पी.आय.महादेव शेलार

### रोटरी क्लब नारायणगाव हायवे च्या वतीने नारायणगाव पोलीस स्टेशन मध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झाला



**नारायणगाव** | रोटरी क्लब नारायणगाव हायवे च्या वतीने नारायणगाव पोलीस स्टेशन मध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झाला त्या कार्यक्रमात बोलताना एपीआय महादेव शेलार आपले विचार व्यक्त करताना पुढे म्हणाले समाजाचे रक्षण करत असताना पोलीस बांधवांना रक्षाबंधनाचा सण साजरा करता येत नाही. रोटरी क्लब मार्फत दरवर्षी हा सण ड्युटीवर साजरा होतो. त्याबद्दल त्यांनी गौरव उद्गार काढले.

याप्रसंगी प्रेसिडेंट रवींद्र वाजगे, सेक्रेटरी योगेश यादव, आयपीपी श्रीकांत फुलसुंदर, ट्रेझर नितीन भुजबळ , सुकाजी मुळे नारायण आरोटे, रामभाऊ सातपुते, अंबादास वामन हे रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.

ए पी आय महादेव शेलार, पीएसआय धूर्वे साहेब, म.पो.हव. धनश्री धांडे , म.पो.कॉ.शुभांगी दरवडे,म.पो.कॉ. पूजा शहा,म.पो.कॉ. सोनाली रघतवान ,पो. कॉ. शैलेश वाघमारे,पो.कॉ. दत्तात्रय ढेंबरे, पो. कॉ. गंगाधर कोतकर, पो.कॉ. गोविंद केंद्रे यांना औक्षण व राखी बांधण्यात आली. औक्षण व राखी उर्मिला वाजगे, वैशाली फुलसुंदर, सुप्रिया यादव ,नीलिमा भुजबळ, मनीषा मुळे, सोनल भालेराव ,गोडसे , संगीता ढमाले, उषा टाकळकर, संगीता कदम , ज्योती हाडवळे, किशोरी कुटे, राजश्री डोंगरे, डॉ. मधुबाला डेरे या रोटरीयन अँनस यांनी केले.

आभार सेक्रेटरी योगेश यादव यांनी मांडले.